.. shri Ganesha Arati ..

# ॥ श्रीगणेश आरती ॥

॥ गणेश आरती ॥

कपोल झरती मदें शुण्डा बहु साजे ।
शेंदुर जो घवघवीत अद्भुत सुविराजे ।
घागरियांचा घोळ पदीं घुळघुळ वाजे ।
प्रसन्नवदना देवा ध्याना सुख माजे ॥ १॥

जय देव जय देव गजनरवेषा ।
आरती ओवाळू तुजला विश्वेशा ॥ धृ ॥

विशेष महिमा तुझा नकळे गणनाथा ।
हरिसी संकट विघ्ने तापत्रयव्यथा ।
अखण्ड आनंदे तू डोलविसी माथा ।
ताण्डवनृत्य करिसी तातक् धिम ताथा ॥ जय ॥ २॥

विद्या धनसंपदा कनकाच्या राशी ।
नारी सुत मंदिरे सर्वहि तू देशी ।
निर्वाणी पावशी वेगीं भक्तांसी ।
गोसावीनंदन गातो कवितांशी ॥ जय ॥ ३॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 22, 1999